# सतयुगाच्या आगमनाचे प्रतिक – ‘महाशिवरात्री’

महाशिवरात्रीच्या उत्सवाचे खूप मोठे महात्म्य आहे. भारतीय दिनदर्शिकेनुसार फाल्गुन महिना हा वर्षाचा शेवटचा महिना किंवा नवीन वर्षाचा शुभारंभ. फाल्गुन महिन्यामध्ये कृष्ण पक्षाच्या चतुर्थीला शिवरात्री साजरी केली जाते. परंतु कल्पाच्या अंताला परमात्म्याचे अवतरण आणि मनुष्यात्म्यांना आत्मज्ञानाच्या द्वारे जागृत करून नवयुगामध्ये घेऊन जाण्याइतके त्यांना लायक बनविणे हेच, या महाशिवरात्रीचे आध्यात्मिक महत्व आहे. भारताच्या कानाकोप-यामध्ये शिवलिंगावर ॐनमो शिवाय मंत्र उच्चारण करून हे महान पर्व साजरे करणे परमात्म्याच्या महान कार्याचे प्रतिक आहे. शिवरात्री पर्व केवळ एक परंपरा नाही पण कलियुगाची समाप्ति व सतयुगाची सुरूवात आहे.

तसे पाहिले तर प्रत्येक वर्षी नवीन वर्षाची सुरवात आणि शेवट हा तर होतोच. तर या सृष्टी चक्रामध्ये चार युगांचा मिळून एक कल्प बनतो. नवीन कल्पाची सुरवात तसेच जुन्या कल्पाची समाप्ति अशा संगमयुगामध्ये महान परिवर्तन होते. या परिवर्तनामध्ये मनुष्याच्या चढत्या आणि उतरत्या कहानीचा खुलासा होतो. कल्पाच्या सुरवातीला मनुष्यात्मा सतोप्रधान आणि सर्वगुणांनी संपन्न असतो. परंतु हळुहळु जन्म मरणाच्या चक्रामध्ये येतायेता कलियुगाच्या अंताला कलाहीन आणि तमोप्रधान बनतो. मनुष्याची बुद्धी मायेच्या आधीन होते आणि विकारांच्या अग्निने संपूर्ण मानवता नष्ट होते, मनुष्याची श्रेष्ठ वृत्ती ही आसुरी वृत्तीमध्ये बदलते. एकेकाळी सोन्याचा भारत म्हटला जाणारा हाच भारत विकार आणि व्यभिचार, अत्याचार आणि भ्रष्टाचारयुक्त बनतो. सृष्टीचक्राच्या या काळामध्ये काही अशा धार्मिक आणि आध्यात्मिक घटना घडतात जे कि, कर्मकांड आणि स्मृतीच्या रूपामध्ये साज-या केल्या जातात.

शिवरात्रीचे पर्व कलियुगी दुनियेचा अंत आणि दैवी दुनियेच्या सुरवातीच्या वेळी परमात्मा या अज्ञानाच्या रात्री झोपलेल्या मनुष्यात्म्यांना जागृत करून श्रेष्ठाचारी बनविण्यासाठी ईश्वरीय ज्ञान आणि सहज राजयोगाचे शिक्षण देत आहेत. “शिवरात्री” पर्व याचे यादगार म्हणून साजरे केले जाते. वास्तविक भावना अर्पित करण्यासाठी शिवलिंग बनविले गेले आहे. शिवलिंग हे परमात्मा शिवाची प्रतिमा आहे अर्थात परमपिता परमात्मा शिव ज्योतिर्बिंदू स्वरूप आणि निराकार आहे. म्हणून त्यांच्या दर्शनासाठी आणि पूजा करण्यासाठी शिवलिंग बनविले गेले. या स्वरूपाची अन्य धर्मामध्ये देखील पूजा अर्चा केली जाते. परमपिता परमात्म्यांना विविध धर्मात नूर, डिवाईन लाईट, ओंकार आणि ज्योतिस्वरूप या नावाने ओळखले जाते.

**नवयुगाच्या पूर्वीची महारात्री** ः हे तर सर्वांना माहित आहे कि, नवयुगाच्या सुरवातीच्या अगोदर कलियुगाची रात्र अर्थात महारात्र असते आणि सर्वत्र पापाचार, अनाचार, अत्याचार आणि अज्ञानाचा बोलबाला असतो. भारतीय शास्त्रांनुसार याच वेळेला घोर रात्रीची उपमा दिली आहे आणि ही वेळ विनाश काळाचे सूचक आहे. ‘मनु’ ने म्हटले आहे कि **‘आर्सीददं तमोभूतम प्रज्ञानम लक्षनम...’.**

जेव्हा घोर अंधकार रात्र होते त्यावेळी अनेक वाईट प्रवृत्तींचे लोक आपले वाईट कार्य सिद्ध करतात. त्यावेळी मनुष्याची माणुसकी राक्षसी रूपात बदलते. लोक आपआपसांत ईर्षा, द्वेष आणि नफरतच्या वादळात फसले आहेत. काम, क्रोध, लोभ, मोहामुळे मनुष्य धर्म-जातिच्या नावावर खून, मारामारी, बलात्कार आणि पळवून नेणे इ. घटना पराकोटीला पोहोचलेल्या आहेत म्हणूनच ही अज्ञानाची घोर रात्री आहे. शिवाय दुसरे काय आहे? हे परमसत्य आहे कि, जेव्हा एखादी गोष्ट अतिमध्ये जाते तेव्हा तिचा अंत अवश्य होतच असतो. ही सारी चिन्हे युग परिवर्तनाची प्रबळ संकेत आहेत. याच अज्ञानाच्या रात्री परमात्मा शिव ब्रह्मलोकांतून या भू-तलावर साधारण मानवी शरीरात अर्थात प्रजापिता ब्रह्माद्वारे नवीन सृष्टीची स्थापना करतात.

pdfMachine
Is a pdf writer that produces quality PDF files with ease!
Produce quality PDF files in seconds and preserve the integrity of your original documents. Compatible across nearly all Windows platforms, if you can print from a windows application you can use pdfMachine.
Get yours now!

**शिवरात्रीची सार्थकता ः** या नाजूक वेळी आपल्याला परंपरेनुसार शिवरात्री साजरी न करता, शिवरात्रीच्या वास्तविक रहस्याला जाणुनच शिवरात्री साजरी करायला हवी. जेणेकरून आपल्या जीवनात सकारात्मक परिवर्तन होईल. शिवरात्री दिवशी शिवलिंगावर वाहिलेल्या वस्तु आध्यात्मिक रहस्यांचे प्रतिक आहे. देवीदेवतांच्या मंदिरांमध्ये सदैव सुंदर सुवासिक दूध, फळे, इत्यादी पदार्थ प्रसाद म्हणून ठेवतात. परंतु विश्वकल्याणकारी परमात्मा शिवाच्या प्रतिमेचे शिवलिंगाच्या रूपात पूजन करतात. शिवलिंगावर ज्या वस्तु अर्पण केल्या जातात, त्याचेही आध्यात्मिक महात्म्य आहे. धोत-याचे फुल दिसायला सुंदर असते पण त्यामध्ये सुगंध नसतो. फूलांसोबत बेलाचे पान काटेरी असूनसुद्धा वाहीले जाते. आणि भांग म्हणजे दारू हा श्रेष्ठ आणि संयमी मनुष्याचा आहार नाही. अशा वस्तु ज्या मनुष्यासाठी उपयुक्त नाहीत, त्या वस्तु शिवलिंगावर कशा वाहील्या जातील?याचाच अर्थ असा कि, आज मनुष्यामध्ये काम, कोध, लोभ, मोह, अहंकार इ. वाईट विकार आहेत ज्यामुळे मनुष्य स्वतः तर दुःखी होतोच परंतु दुस-यांनासुद्धा दुःखी करतो. या सर्व गोष्टी शिवावर अर्पित करून, परमपिता परमात्मा शिव भोलेनाथकडून सदगुण घेऊन आपल्या जीवनात धारण करण्याचा आपण संकल्प करूया. परमधाम निवासी परमात्मा शिव कलियुगाच्या अंताला धरतीवर येऊन आम्हा सर्व मनुष्यात्म्यांना हेच मागत आहेत कि, तुम्ही तुमच्या सर्व वाईट गोष्टी मला दया आणि माझे सर्व सदगुण घ्या,मी तुम्हाला ईश्वरीय शक्ति आणि सदगुणांनी भरपूर करेन.

परमात्मा शिव इतके दयाळू आणि कृपाळू आहेत कि, आपल्या सर्व गोष्टी स्वीकारून आपल्याला त्या बदल्यात सदगुण सुख आणि शांति बहाल करतात. म्हणून, शास्त्रांतसुद्धा दाखविले आहे कि, राक्षस ज्यावेळी तपस्या करतात तेव्हा ते त्यांच्यावरसुद्धा प्रसन्न होऊन वरदान देत असतात. याचा अर्थ असा कि, आज जे मनुष्य राक्षसी प्रवृत्तीमुळे राक्षससमान बनत आहेत,त्यांना पुन्हा परमात्मा अवतरित होऊन प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाद्वारे नराला नारायण आणि नारीला लक्ष्मी बनविण्याचे महान कार्य करत आहेत.

**नवयुगाच्या आगमनाची चाहूल ः** आज दुनिया विकारांमध्ये जळत आहे तसेच नैसर्गिक प्रकोप यामध्ये जागतिक वाढते तापमान, परमाणु बॉम्ब आणि हायड्रोजन बॉम्बचा वाढता साठा आणि आतंकवादयांची दृष्ट कृत्ये इ. कोणत्याही वेळी सा-या दुनियेला विध्वंस करू शकतात. ही कालियुगाची अंतिम वेळ आहे. याचवेळी परमात्मा भूतलावर येऊन सत्ययुगाची स्थापना करीत आहेत. म्हणून आता ज्ञानाचा तिसरा नेत्र उघडा आणि अज्ञानतेला दूर करा आणि परमात्म्याला ओळखून खरी खुरी शिवरात्री साजरी करा हाच महाशिवरात्री दिवशी परमपिता शिव परमात्म्याचा संदेश आहे.

प्रति,
सादर प्रकाशनार्थ ,
दै.
कार्यालय, इचलकरंजी.

pdfMachine
**Is a pdf writer that produces quality PDF files with ease!**
Produce quality PDF files in seconds and preserve the integrity of your original documents. Compatible across nearly all Windows platforms, if you can print from a windows application you can use pdfMachine.
Get yours now!